# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.06.2025** **वारःशनिवार**

1. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारमूल्य मिळण्यासाठी पुण्यात कापूस, हळद आणि मका पिकांकरता 'हेजिंग डेस्क' सुरू
2. 2026 च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा
3. पीएम श्री शाळा योजनेच्या धर्तीवर राज्यात सीएम श्री आदर्श शाळा योजना आणि
4. स्वदेशी बनावटीच्या क्लोज क्वार्टर बॅटल कार्बाईन बंदुकीचा लवकरच भारतीय लष्करात समावेश

**मुख्यमंत्री-हेजिंग डेस्क**

कृषी क्षेत्रातील विकासाच्या दिशेनं हेजिंग डेस्क उपक्रम एक महत्वाचं पाऊल आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. या प्रकल्पाबाबत माहिती देताना ते काल बोलत होते. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात पुण्यात कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू केला आहे. टप्प्या-टप्प्यानं इतर पिकांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या हेजिंग डेस्कबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

हेज म्हणजे बाहेरून येणाऱ्या संकटांपासून संरक्षणासाठी, त्यांना अटकाव करण्यासाठी बांधलेलं साधन. शेतमालाच्या, शेतीविषयक साधनांच्या किंमतीच्या चढ-उतारातून निर्माण होणाऱ्या संकटापासून संरक्षण देणारं हे एक प्रकारचं कुंपणच आहे. भविष्यकाळात कमी होणाऱ्या किंमतींमुळे निर्माण होणारी जोखीम कमी करणं हा हेजिंगचा मुख्य उद्देश आहे. याअंतर्गत शेतकरी आणि कृषी उत्पादक कंपन्यांना वायदे बाजारात सहभागी होण्यासाठीचं प्रशिक्षण देण्यासाठी तसंच मार्गदर्शनासाठी 'हेजिंग डेस्क' सुरु करण्यात आलं आहे. यामध्ये कापूस, हळद आणि मका या पिकांच्या पट्ट्यांमधील शेतकरी उत्पादक संघटना आणि शेतकऱ्यांवर अधिक लक्ष देण्यात येईल. हेजिंग डेस्कद्वारे शेतकरी उत्पादक संघटना आणि क्लस्टर आधारित व्यवसाय संघटनांना तज्ज्ञ व्यक्ती सेवा कमोडिटी कराराबद्दल माहिती देतील. शेतकरी उत्पादक संघटनाना आणि शेतकऱ्यांना शेतीजवळ साठवणूक केंद्रं उभारण्यासाठी प्रोत्साहन दिलं जाईल. दुसरं म्हणजे, जोखीम व्यवस्थापन कक्षाअंतर्गत विविध प्रकारच्या जोखमींचा अभ्यास केला जाईल, जोखीम निवारणासाठीची धोरणं तयार केली जातील. शेतकरी उत्पादक संघटना आणि क्लस्टर आधारित व्यवसाय संघटना तसंच शेतकऱ्यांना एनसीडीईएक्स संस्थेच्या संकेतस्थळावर हेजिंग डेस्कबद्दल अधिक माहिती मिळेल. आकाशवाणी बातम्यांसाठी सुरेखा जोशी यांच्यासह प्रशांत जाधव पुणे.

**मुख्यमंत्री-गणेश मूर्ती**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात प्रथा, परंपरांचा मान राखत पर्यावरणाच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेलं धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. सार्वजनिक गणेश विसर्जनानंतर समुद्रकिनारे स्वच्छ करण्याची काळजी घेण्यासाठी ठोस उपाय करावेत तसंच गणेशमूर्ती तयार करताना पर्यावरणस्नेही सामुग्रीचा आणि नैसर्गिक रंगांचा वापर करावा असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या बैठकीला सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांच्यासह वरीष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते.

**राज्यपाल**

विद्यार्थ्यांनी निश्चित उद्दीष्ट समोर ठेवून त्याला कठोर परिश्रम, एकाग्रतेची जोड दिल्यास आणि निराश न होता प्रयत्नरत राहिल्यास त्यांना भविष्यातील वाटचालीत निश्चितपणे यश संपादन करता येईल, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी

काल पुण्यात केलं. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलपती. डॉ. एस. बी. मुजुमदार, प्र. कुलगुरू डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमन, आणि अन्य मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते 22 देशातल्या 82 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

**साखर उत्पादन**

2026 या वर्षीच्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन 15 टक्क्यानं वाढून साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे ही वाढ होण्याची शक्यता एका पतमानांकन संस्थेच्या अहवालात वर्तवली आहे. जास्त पाऊस पडल्यामुळे ऊस उत्पादक राज्यांमध्ये, विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटकात, उसाचं उत्पादन आणि लागवडीखालचं क्षेत्र वाढणार आहे. त्यामुळे देशांतर्गत पुरवठ्याची चिंता कमी होईल. धोरणात्मक परिस्थिती अनुकूल राहिली तर इथेनॉल उत्पादनही मोठ्या प्रमाणात होईल, असं या अहवालात म्हटलं आहे.

**सीएमश्री**

केंद्र सरकारच्या पीएम श्री शाळा योजनेच्या धर्तीवर राज्यात सीएम श्री आदर्श शाळा योजना राबविण्यात येणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काल छत्रपती संभाजी नगर इथं केली. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. सीएम श्री शाळा योजने अंतर्गत जवळपास 5 हजार शाळा विकसित करण्यात येतील; तसंच 10 हजार शाळांमधील "एक वर्ग आदर्श वर्ग" करण्यात येणार आहे, असं भुसे म्हणाले. राज्यात 10 हजार शिक्षकांची भरती प्रक्रिया प्रगतीपथावर असून या माध्यमातून कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**स्वदेशी बंदूक**

संपूर्णपणे स्वदेशी प्रणाली असलेली, क्लोज क्वार्टर बॅटल कार्बाईन बंदूक भारतीय लष्करात दाखल होण्यास सज्ज झाली आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात DRDO च्या पुण्यातील शस्त्र संशोधन आणि विकास संस्थेनं ती विकसित केली आहे. क्लोज क्वार्टर बॅटल म्हणजे खोल्या, येण्याजाण्याचा मार्ग किंवा वाहनं यासारख्या मर्यादित जागांमध्ये होणारी लढाई असते. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**नव्याने विकसित करण्यात आलेली हि बंदूक वजनाला हलकी आणि प्रभावी आहे. आत्मनिर्भर भारत या मोहिमेतील महत्त्वाचं उत्पादन आहे. ARDE ने दिलेल्या माहिती नुसार रक्षण मंत्रालयाने नोव्हेंबर 2022 मध्ये सुमारे चार लाखांहून अधिक अत्याधुनिक बंदूक खरेदीसाठी प्रक्रिया सुरु केली होती. या प्रक्रियेत अनेक भारतीय कंपन्यांनी त्यांच्या उत्पादनांची निवडप्रक्रियेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी, भारत फोर्जने सादर केलेली आणि ARDE ने विकसित केलेली CQB कार्बाईन किफायतशीर आणि सक्षम पर्याय म्हणून मान्य करण्यात आली, अशी माहिती DRDO च्या अधिकाऱ्यांनी दिली. आत्मनिर्भर भारत उपक्रमांच्या अनुषंगाने, ही कार्बाईन देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षेत्रात एक मोठी कामगिरी मानली जाते. आकाशवाणी बातम्यांसाठी श्रद्धा वार्डे, पुणे.**

**संवादवारी**

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासोबत 'संवादवारी' उपक्रम राबवत आहे. त्याअंतर्गत प्रदर्शन, चित्ररथ, एलईडी व्हॅन, कलापथक आणि पथनाट्याच्या माध्यमातून शासकीय योजनांचा जागर सुरू आहे. सातारा जिल्ह्यातल्या तरडगाव आणि फलटण इथं या उपक्रमाला वारकरी आणि ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

**आरोग्यवारी**

राज्य महिला आयोगानं आयोजित केलेला आरोग्यवारी उपक्रम स्तुत्य असल्याचं राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटलं आहे. इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी इथं आयोजित आरोग्य वारी उपक्रमात ते बोलत होते. आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या महिलांना चांगल्या प्रकारच्या आरोग्यविषयक सोई-सुविधा मिळाव्यात याकरता हा उपक्रम राबवण्यात येत आहे. वारकरी महिलांना सॅनिटरी नॅपकिन, बालकांना स्तनपानाकरिता हिरकणी कक्ष, न्हाणीघर, शौचालय, स्वच्छतागृह, दामिनीपथक, प्राथमिक उपचार, रुग्णवाहिका आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

**पंढरपूर रेल्वे-सोलापूर**

आषाढी यात्रेसाठी मध्य रेल्वेतर्फे सोलापूर विभागातून 3 अतिरिक्त गाड्या सोडण्यात येणार आहेत. मिरज नागपूर; मिरज लातूर आणि पुणे मिरज या तीन विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहेत.

**वनमंत्री**

राज्याच्या अर्थ विभागाकडे विकासकामांसाठी निधी मागण्याऐवजी वन विभागच आर्थिक सक्षम होऊन राज्य सरकारला पैसे देऊ शकेल अशा दृष्टीनं येत्या चार वर्षांत वन विभागाची क्षमता निर्माण केली जाणार असल्याची भूमिका राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी मांडली. 'लोकसहभागातून वन संवर्धन आणि पर्यावरण पूरक उपजीविका' या दोन दिवसांच्या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी नाईक पुण्यात बोलत होते. वन विभाग, डीईएस पुणे विद्यापीठ आणि वनवासी कल्याण आश्रम यांनी ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

**कोल्हापूर चित्रनगरी**

कोल्हापूरमधल्या चित्रनगरीत गेल्या तीन वर्षांत झालेल्या विविध विकास कामांचा उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते आज होणार आहे. पोस्ट प्रॉडक्शन स्टुडिओचा भूमिपूजन समारंभही यावेळी शेलार यांच्या हस्ते होईल. तसंच ज्येष्ठ अभिनेते सूर्यकांत मांढरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कोल्हापूर चित्रनगरीनं आज संध्याकाळी शाहू स्मारक इथं 'चित्रसूर्य' हा सांगितिक कार्यक्रम आयोजित केला आहे. ही चित्रनगरी आज नागरिकांना विनाशुल्क पाहता येईल.

**हवामान**

कोकणात काही ठिकाणी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट भागात काही ठिकाणी तर विदर्भात वीजांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.